## नि.दि.मु.क्र.९४/२०१८ मधील आय.ए. क्र. ५/२०१९ ते ७/२०१९ (निशाणी २५ ते २७) वरील संयुक्तीक आदेश

निशाणी २५ कडील अर्ज प्रतिवादी क्र. ३ विरुध्द दावा अवसान पावला तो आदेश रद्द करण्यासाठी, निशाणी २६ कडील अर्ज प्रतिवादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफीसाठी, निशाणी २७ कडील अर्ज प्रतिवादी क्र. ३ चे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळावी यासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

०२. वादीचे असे म्हणणे आहे की प्रतिवादी क्र. ३ ही मयत झालेली आहे. प्रतिवादी क्र. ३ चे वारस मुदतीत दाखल न केल्याने प्रतिवादी क्र. ३ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. प्रतिवादी क्र. ३ ही मयत झालेली असल्याबाबत न्यायालयाचे समन्स न बजावता परत आल्याने समजले. तिच्या मृत्यूचा दाखला वादीला बरेच प्रयत्न करुनदेखील उपलब्ध झालेला नसल्याने तसेच तिच्या कायदेशीर वारसांची नावे व पत्ते देखील वेळीच उपलब्ध न झाल्याने अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला असल्याचे व प्रतिवादी क्र. ३ विरुध्द दावा अवसान पावल्याचे वादीचे म्हणणे आहे. प्रतिवादी क्र. ३ चे कायदेशीर प्रतिनिधी हे नोटीसची बजावणी होवूनदेखील हजर न झाल्याने त्यांच्याविरुध्द प्रस्तुत अर्ज एकतर्फा चालविण्यात आलेले आहेत. प्रतिवादी क्र. १, ४ व ६ यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतलेला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की वारस दाखल करण्यास विनाकारण विलंब केलेला आहे. अर्जातील कारण संयुक्तीक नाही. प्रतिवादी क्र. ३ मयत झाल्याची बाब वादीस माहिती असूनही वादीने दाव्यात मयतास पक्षकार केलेले आहे. सबब, सदरचे अर्ज नामंजूर करण्यात यावेत अशी त्यांनी विनंती केली.

०३. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. ३ ही मयत झाली या तथ्याबाबत प्रतिवादी क्र. १, ४ व ६ यांनी कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. प्रतिवादी क्र. ३ च्या मृत्यूनंतर तिच्या कायदेशीर

प्रतिनिधींविरुध्द दावा पुढे चालविण्याचा अधिकार टिकून राहत आहे. अर्जात नमूद केलेले कारण हे शपथेवर नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जातील कारण संयुक्तीक आहे. सबब, तिनही अर्ज मंजूर करण्यात येतात.

**०४.** प्रतिवादी क्र. ३ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो. तसेच प्रतिवादी क्र. ३ विरुध्द दावा अवसान पावल्याचा आदेश रद्द करण्यात येतो. वादीस मयत प्रतिवादी क्र. ३ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते. त्याअनुषंगे पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी दावा दुरुस्ती करण्यात यावी व दुरुस्त दाव्याची प्रत सादर करण्यात यावी.

Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2021.03.02 17:17:20 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

दि. ०२/०३/२०२१ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

"CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT."

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER